


दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक १७४ वा ● मंगळवार १४ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 174 | Date : 14/11/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## शेतकरी हिताच्या बांधिलकीचा प्रत्यय : मुख्यमंत्री

### पीएम कुसुम योजनेत महाराष्ट्र अग्रेसर; सुमारे ७१ हजार ९५८ सौर कृषीपंप केले स्थापित

मुंबई : पीएम कुसुम योजनेत देशात पहिले स्थान पटकावून महाराष्ट्राने शेतकरी हिताच्या योजनांच्या अंमलबजावणीतील आपल्या बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला आहे. हे राज्य बळीराजाचे आहे, त्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहोत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भावना व्यक्त करून राज्याच्या ऊर्जा विभागाचे कौतुक केले आहे. महाराष्ट्राने सुमारे ७१ हजार ९५८ सौर पंप स्थापित केले आहे.


उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेला यापूर्वीच गती देण्यात आली होती. त्यांच्या पुढाकाराने ऊर्जा विभागाने शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे, यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषीपंप उपलब्ध करून देण्यासाठी पीएम कुसुम योजना प्रभावीपणे राबविली आहे. या अव्वल स्थानासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी ऊर्जा मंत्री श्री. फडणवीस यांचे पुढाकारासाठी आणि तसेच महाऊर्जाशी संबंधित अधिकारी - कर्मचारी यांचेही अभिनंदन केले आहे.मुख्यमंत्री यांनी



आपल्या संदेशात म्हटले आहे की, राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्राचाही आपण आपल्या शेतकरी बांधवांच्या जिव्हाळ्याच्या कृषी पंपांसाठीही प्रभावीपणे वापर करून घेतो आहे. यामुळे आपल्या बळीराजाला सिंचनासाठी खात्रीलायक असा ऊर्जा पर्याय उपलब्ध होईल. हा पर्याय कमी खर्चाचा आणि भरवशाचा देखील आहे. ऊर्जा विभागाने केंद्राच्या यंत्रणांशी समन्वय साधून साध्य केलेले उद्दीष्ट हे केवळ एक टप्पा आहे. या योजनेतून अधिकाधिक शेतकऱ्यांना सौर कृषी पंप मिळावेत, असे प्रयत्न आहेत. यासाठी महाऊर्जाने आपल्या या कार्यप्रणालीत सातत्य राखावे, तसेच शेतकऱ्यांमध्ये या ऊर्जा स्त्रोताविषयी आणखी जागरुकता निर्माण करावेत. महाराष्ट्राचे हे स्थान कायमच अव्वल राहावे यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय 'किसान ऊर्जा सुरक्षा व उत्थान महाभियान' 'कुसुम' योजनेत राज्यांना ९ लक्ष ४६ हजार ४७१ सौरपंप बसविण्यासाठी मान्यता दिली आहे. देशात यापैकी एकूण २ लक्ष ७२ हजार ९१६ सौर पंप स्थापित झाले आहेत. यामध्ये सर्वात जास्त सौर कृषीपंप महाराष्ट्रामध्ये महाऊर्जामार्फत बसविण्यात आले आहेत.पीएम कुसुम योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जामार्फत स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले आहे. महावितरणकडे कृषीपंप जोडणीसाठी अर्ज केलेल्या मात्र अनामत रक्कम न भरलेल्या शेतकऱ्यांना आता सौर कृषीपंप देण्याच्या योजनेवरही भर देण्यात येत आहे. महाराष्ट्राने अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० तयार करून या क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल यापूर्वीच टाकले आहे. राज्याने पुढील पाच वर्षांसाठी पाच लाख कृषीपंपाना मान्यता दिली आहे.

## बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल!

### माऊलींच्या गाभाऱ्यात मोसंबीचा बहर



**आज दिवाळी पाडवा... यानिमित्तानं पंढरीत माऊलींच्या राऊळीला आकर्षक सजावट केली आहे. बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल! माऊलींच्या गाभाऱ्यात मोसंबीचा बहर दिवाळी पाडव्यानिमित्त छत्रपती संभाजीनगरच्या विठ्ठल भक्तानं सात हजार मोसंबी वापरून मंदिरात आकर्षक सजावट केली आहे. आज दिवाळी पाडव्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्याच्या वाघाली येथील आप्पासाहेब रामकृष्ण पाटील या विठ्ठल भक्तानं सजावट केली आहे. सात हजार मोसंबी वापरून विठ्ठल मंदिरात आकर्षक सजावट केली आहे.**

## '१६ वर्षांनंतर हमासचं गाझावरील नियंत्रण संपलं', इस्त्रायली संरक्षणमंत्र्यांचा दावा

नवी दिल्ली : हमास आणि इस्रायल यांच्यातील युद्धाच्या वणव्याची धग कायम आहे. या संघर्षाला एक महिना उलटून गेला असला, तरी हे युद्ध थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. गाझा पट्टीचून हमासचं नायनाट केल्याशिवाय हे युद्ध थांबणार नसल्याचं इस्रायलने म्हटलं आहे. इस्रायलकडून गाझा पट्टीत हल्ले सुरुच आहेत. आता इस्रायल लष्कर हवाई मार्गासह गाझामध्ये घुसून हमासच्या दहशतवाद्यांना लक्ष्य करत आहे. दरम्यान, इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. नागरिकांचा आता हमासवर विश्र्वास राहिलेला नाही, असा दावा इस्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलंट यांनी केला आहे. गाझातील नागरिक आता हमासचे तळ लुटत आहेत, असाही दावा त्यांनी केला आहे. गाझा पट्टीमध्ये इस्रायल लष्कराने केलेल्या हल्ल्यात ११,२४० लोकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ४६३० मुलांचा समावेश आहे. गाझावरील हल्ल्यानंतर अनेक दिवसांनी इस्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलंट यांनी दावा केला आहे की, हमासचे गाझावरील नियंत्रण सुटलं आहे. १६ वर्षांनंतर हमासचं गाझावरील प्रभुत्व संपुष्टात आलं आहे. आता पॅलेस्टाईनच्या नागरिकांना हमासवर विश्र्वास नाही. गाझामधील नागरिक हमासचे तळ लुटत आहेत.

एएफपीच्या वृत्तानुसार, इस्रायली संरक्षण मंत्र्यांनी दावा केला आहे की, हमासचा गाझावर १६ वर्षांपासून ताबा होता. पण, हमासने आता गाझा पट्टीवरील नियंत्रण गमावलं आहे. त्यामुळे हमासचे दहशतवादी पळ काढत आहेत. हमासचे दहशतवादी दक्षिणेकडे पळून जात आहेत. हमासचे तळ नागरिकांनी उद्ध्वस्त केलं आहेत. नागरिक हमासच्या तळांना लक्ष्य करत लूटमार करत आहेत. गाझातील नागरिकांचा सरकारवर विश्र्वास नाही.

## शरद पवार गटाची लोकसभा जागांसाठी तयारी सुरु



मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काही महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना आता राजकीय पक्षांकडून लोकसभा जागा लढवण्यासाठीची तयारी सुरू करण्यात आली आहे. देशव्यापी पातळीवरील इंडिया आघाडीतील महाविकास आघाडीतही जागा वाटपाचे सूत्र निश्र्चित झाल्याची चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून लोकसभा आणि विधानसभांसाठीची तयारी सुरू झाली आहे. शरद पवार गटाने लोकसभा जागांसाठीची तयारी सुरू केली आहे.

राज्यात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि काँग्रेस यांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप जवळपास निश्र्चित झाल्याची चर्चा आहे. अशातच आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आगामी लोकसभा निवडणुकीत १२ जागा लढवण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्याशिवाय, खासदार अमोल कोल्हे यांच्याबाबत खासदार सुनील तटकरे यांनी जो दावा **। पान २ वर**

## पाच दिवसांत गावोगावच्या उपसरपंचांच्या निवडी होणार

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यातील नुकत्याच झालेल्या १०९ ग्रामपंचायतींच्या निवडणूक निकालाची अधिसूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाहीर केली असून उपसरपंच निवडीचा कार्यक्रमही त्यांनी घोषित केला आहे. येत्या पाच दिवसांत निवडणूक झालेल्या सर्व ग्रामपंचायतींच्या उपसरपंचपदाची निवड प्रक्रिया राबविण्याची सूचना त्यांनी केली आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सरपंचपद हे थेट जनतेतून निवडून दिले आहे. त्यामुळे आता केवळ उपसरपंचांचीच निवड होणार आहे.

## कार्तिकीवारी २०२३ निमित्त पंढरपूर शहर वाहतूक मार्गात बदल

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री क्षेत्र पंढरपूर येथे कार्तिकवारी दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ ते दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत भरणार असुन सदर यात्रा कालावधीत पंढरपूर शहर बाहयमार्गावरून जाणा-या जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात दाखल होणा-या भाविकांच्या जिवितेला धोका व वाहतुक नियमनास अडथळा होवु नये या करीता उपविभागीय पोलीस अधीकारी पंढरपूर उपविभाग पंढरपूर यांनी त्यांचे कडील ३० ऑक्टोबर २०२३ अन्वये पंढरपूर शहराकडे येणारी जड अवजड वाहतुक संबंधीत पोलीस ठाणे हददीतील योग्य त्या पॉईन्ट वरून बंद करून ती पर्यायी मार्गावरून वाहतुक वळविणेबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने शिरीष सरदेशपांडे पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) च्या अन्वये मला प्राप्त असलेल्या शक्तीच्या अधारे दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी ००.०१ ते दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी २४:०० वा. पर्यंत पंढरपूर शहर बाहय मार्गावरून जाणारी जड वाहतुक अन्य पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने खालील नमुद पॉईन्टवरून जड अवजड वाहतुक बंद (शासकीय अन्नधान्य, डिझेल, पेट्रोल, गॅस सिलेंडर, उस वाहतुक करणारी वाहने वगळुन ) करण्यात येत असल्याचे आदेश देत आहे.

पोलिस ठाणे - मोहोळ - जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाण- शिवाजी चौक- पर्यायी मार्ग -मोहोळ, कामती- मंगळवेढा-सांगोला. , किंवा मोहोळ-शेटफळ- टेंभुर्णी- वेळापूर- सांगोला.

जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाण -शेटफळ चौक - पर्यायी मार्ग - शेटफळ- टेंभूर्णी- अकलुज-वेळापूर -महुद-सांगोला. किंवा शेटफळ- माहोळ- कामती-मंगळवेढा - सांगोला .जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाण - टाकळी सिकंदर - पर्यायी मार्ग -टाकळी सिकंद -कुरूल -माहोळ-शेटफळ- टेंभुर्णी . किंवा टाकळी सिकंदर-कुरूल कामती- मंगळवेढा- सांगोला- महुद- वेळापूर.

पोलीस ठाणे - कामती -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण - कुरूल चौक -पर्यायी मार्ग- करूल- कामती **। पान २ वर**

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांना धमकी; गृहमंत्री, मुख्यमंत्र्यांकडे सुरक्षा वाढवण्याची मागणी

मुंबई : राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच जोर धरत असल्यानं राज्यात सध्याचं राजकारण चांगलंच तापलं आहे. असं असतानाच विधानसभेचे विरोधी पक्षनेते नेते विजय वडेट्टीवार यांना मोबाईलवर धमकी आल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात स्वतः विजय वडेट्टीवार यांनी धमकी आल्याची बाब राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कळवली आहे. सध्या विजय वडेट्टीवार यांना वाय प्लस सुरक्षा असून त्यात तीन जवान आणि एक गाडी अशी सुरक्षा व्यवस्था आहे. मात्र, सुरक्षिततेच्या कारणामुळे त्यात आणखी वाढ करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.



राज्यात ऐन हिवाळ्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापत असल्याचे चित्र आहे. त्याची धग आता थेट विधानसभेचे विरोधी पक्षनेते नेते विजय वडेट्टीवार यांना धमकी देण्यापर्यंत तर येऊन पोहचली नाहीये ना? असा प्रश्न या निमित्तानं उपस्थित झाला आहे. असा प्रश्न उपस्थित करण्यामागील कारण म्हणजे, विजय वडेट्टीवार यांनी नुकतंच केलेलं जरांगे पाटलांवरील वक्तव्य. जरांगे पाटील यांना मराठा समाजाच्या भल्या पेक्ष्या स्वतःचा राजकीय फायदा। **पान २ वर**

## लगातार दोन वेळा झेंडू ने शेतकऱ्यांना मारले




सोलापूर/महेश गायकवाडः लगातार दोन वेळा झेंडू फुलाने शेतकऱ्यांना मारले आहे. भाव पडल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांना झेंडू अत्यंत कमी भावात आणि नाममात्र दरात विकला यामुळें झेंडू फुलाची आवक बाजार पेथांमध्ये मोठ्या प्रमाणावर झाली परिणामी बाजार पेठेत झेंडू मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला, यातच पुणे जिल्ह्यातील कलकत्ता झेंडू आणि हरियाणा तील पिवळ्या फुलांचा झेंडू ने बाजार पेठा मध्ये मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातला यामुळें सोलापुरातील सर्वच ठिकाणी झेंडू चे दर संध्याकाळी ६ वाजल्या नंतर अत्यंत मोठ्या संख्येने खालीआले परिणामी भाव गडगडले आणि व्यापाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले यामुळें व्यापाऱ्यां नी बाळी वेस स्टेशन आणि महात्मा फुले सुपर मार्केट या ठिकाणी झेडू अक्षशः रस्त्यावर फेकला हे गंभीर संकट शेतकऱ्यावर दुसऱ्यांदा ओढवले आहे आज रात्री दहा वाजता

सुयश मीडिया ग्रुप च्या टीम ने सोलापूर मधील सर्व मंडई परिसरात फेरफटका मारत झेंडू फुलाचे दर केवळ १० ते २० रूपये किलो दरावर का आले याचा कानोसा घेतला असता लगातार दुसऱ्यांदा अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याने व्यापाऱ्यानी सांगीतले ठाणे पुणे आणि जळगाव नाशिक सिन्नर तसेच कर्नाटक च्या विजापूर आणि तसेच जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कलकत्ता झेडु तसेच हरियाणातील पिवळा झेंडू बाजारात उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगीतले, अशी परिस्थिती एका महिन्यात दुसऱ्यांदा घडली आहे अशी माहिती संतोष कोकरे या फुल विक्रेत्याने दिली, तर मधला मारूती येथील लाडलेसाब बागवान यांनी सांगीतले की दसरा सणाच्या वेळीही झेंडू फुलाचे दर पडल्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगीतले

## थंडीत पावसाचा खेळ! राज्यासह देशात पावसाची शक्यता

मुंबई : राज्यासह देशात गुलाबी थंडीला चाहूल लागली असली तरी, मधेच अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. दिवाळीत राज्यासह देशभरात वरुणराजाची हजेरी पाहायला मिळत आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यासह देशात अवकाळी पाऊस पाहायला मिळत आहे. राज्यात मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यातील काही भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. आज महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीसह काही ठिकाणी तुरळक पावसाच्या सरी पाहायला मिळणार आहेत.



हवामान खात्यानुसार, मंगळवारी १४ नोव्हेंबरला तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ, आंध्र प्रदेशमध्ये वादळ, विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. राज्यात आज काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण किनारपट्टी भागात तसेच मध्य महाराष्ट्रात पावसाचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे.

भारतीय हवामान विभाग ने दिलेल्या माहितीनुसार, १४ नोव्हेंबर रोजी तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल या किनारपट्टीच्या प्रदेशात मुसळधार तर काही भागात अति मुसळधार पावसाचा अंदाज आहे. या भागात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. आयएमडीने तामिळनाडू, पुद्दुचेरीसह कराईकलसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलच्या किनारपट्टीच्या भागात आज १४ नोव्हेंबर रोजी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

आज तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलच्या अनेक किनारी भागात आणि तमिळनाडूच्या भागात काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. विभागाने रामनाथपुरम, पुदुक्कोट्टई, तंजावर, तिरुवरूर, नागापट्टिनम, मायलादुथुराई, तामिळनाडूमधील कुड्डालोर जिल्ह्यांतील आणि कराईकल भागात वेगळया ठिकाणी मुसळधार ते अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. कन्याकुमारी, तिरुनेलवेली, थुथुकुडी, शिवगंगा, पेरांबलूर, अरियालूर, **। पान २ वर**

# बुद्धांच्या विचारांचे डॉ.आंबेडकरांसारखे तत्वज्ञानी बना

## मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन : धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळा साजरा



लाखांदूर/प्रतिनिधीः तथागत बुद्ध यांनी नवा मानव मुक्तीच्या कल्याणासाठी धम्म निर्माण करुन रुजविला. त्याचे प्रचार प्रसार करुन धम्माचे प्रवर्तन केले. धम्मासह विचार आणि तत्वज्ञान सांगितले. यालाच हजारो वर्षानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचे महत्त्व लक्षात घेऊन विजयादशमीला नागांच्या नागभूमीत धम्मदीक्षा सोहळा पार पाडला. म्हणूनच बुद्धांच्या विचारांचे डॉ आंबेडकरांसारखे तत्वज्ञानी बना. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. तते दिघोरीमोठी येथे कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी विचार मंचावर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद सदस्य अविनाश ब्राम्हणकर, मधूकर अंबादे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच सुनिता साळवे, कवी खेमचंद रंगारी, पंचायत समिती सभापती संजना खरवडे, माधूरी हुकरे, माजी जिल्हा परिषद सदस्य व्यंकट मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते हंसराज रामटेके, धम्मदीप मेश्राम, राजोलीचे संजय कांबळे, श्री वानखेडे, सो. ढोके आदी मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी साकेत बौद्ध विहार समिती व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती विहारात तथागत बुद्धांना अभिवादन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला माळ अर्पण करण्यात आले व अभिवादन केले गेले. सदर कार्यक्रम दिघोरीमोठी येथे सायंकाळी ०६.०० वाजता पार पडला. व्यंकट मेश्राम, के ए रंगारी, संजय कांबळे, अविनाश ब्राम्हणकर यांनी मार्गदर्शन केले.

पूढे बोलताना प्रा. नंदागवळी म्हणाले- बौद्ध धम्मात चर आर्य सत्य, आठ अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, २२ प्रतिज्ञा व अष्ठशिलाचे पालन करावे. नागभूमीत रक्तविहीत क्रांती डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ ला पाच लाख लोकांना धम्मदीक्षा दिली. धम्म अनुशरण करा म्हणजे लवकर समजेल. सामाजिक सलोखा जोपासत सामुहिक भोजनदान करण्यात आले. रात्री भीमगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सुत्रसंचालन प्यारेलाल लोणारे यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार अध्यक्ष चंद्रशेखर ढोके यांनी केले. यशस्वीतेसाठी सचिव सुरज लोणारे, फूलचंद राऊत, शैलेश साखरे, सुनिल नंदागवळी, काशिनाथ चौधरी, दयाराम नंदागवळी, निर्मला वैद्य यांनी परिश्रम घेतले.

# रिपाइं(आठवले गट)जिल्हा उपाध्यक्षपदी सैदप्पा झळकी यांची नियुक्ती

अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया (आठवले) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून दुधनी चे सैदप्पा झळकी यांची निवड करण्यात आली आहे.

रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया (आठवले) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारताचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.डां.रायदास आठवले यांच्या आदेशानुसार,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा महात्मा फुले विकास मंडळाचे माजी.अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनात आणी जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले यांच्या नेतृत्वाखाली रिपाइं सोलापूर जिल्हा कार्यकारिणी नुकत्याच झाहीर करण्यात आली असून त्यात जिल्हा अध्यक्ष म्हणून माळशिरसचे सोमनाथ भोसले यांची तर उपाध्यक्ष म्हणून दुधनी(ता.अक्कलकोट) चे सैदप्पा शिवयोगी झळकी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्ष हे डां.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील पक्ष असून त्यांच्या मरणानंतर स्थापना झाली होती. या पक्षातील नेते व दलित चळवळीतील अनेक नेते कालांतराने विविध पक्ष व संघटन स्थापना केली. पण रामदास आठवले हे रिपब्लिकन पक्षासचे एकनिष्ठ राहून महाराष्ट्र राज्या बरोबर संपूर्ण देश भरात पक्षाचे प्रचार आणी प्रसार करत आहे.म्हणून सैदप्पा झळकी हे आठवले व सरवदे यांच्या कट्टर समर्थक बनवून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात प्रामाणिक पणे काम करत राहिले. असे काम केल्याने आज मला या पदापर्यंत पोहचण्याचा संदी मिळाल्याची बाब झळकी यांनी आमच्या प्रतिनिधित्व बोलताना म्हणाले.

या पूर्वी विध्यार्थी जीवनापासून समाजकार्य असो विवाह समारंभ किंवा महापुरुषांचे जयंतीच्या कार्यात हीरीहीरीने भाग घेणे सुरु झाली आहे.भीमनगर येथे मुलांना शिक्षणासाठी शाळा नाही म्हणून एक ते दिड किलो मिटर चलत जावे लागत होती,येथे जि प प्रा शाळा सुरु करण्यास प्रयत्न केल्याने आज आठवी पर्यंत शाळा भीमनगरात चालु आहे.



राजकीय प्रवास एकिकृत रिपब्लिकन पक्षाचे भीमनगर दुधनी चे पहिले अध्यक्ष,दुधनी शहर अध्यक्ष,दुधनी विभागीय अध्यक्ष,ता उपाध्यक्ष,ता कोषाध्यक्ष,ता सरचिटणीस या तालुक्यातील पद भोगल्यनंतर पहिल्यांदा सन २०१९ मध्ये जिल्हा कार्यकारिणी वर चिटणीस म्हणून तत्कालीन जिल्हा अध्यक्ष जितेंद्र बनसोडे यांच्या नेतृत्वात नियुक्त केला होता. आता दुसऱ्यांदा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. एक पक्ष,एक झेंडा आणी एक नेता या उक्ती प्रमाणे पक्षाचे काम करत असताना अनेक अडीअडचणी आल्यावर मा राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शन घेवून खडतर मार्ग पार करत आलो. आता पर्यंत कुठल्याही वयक्तिक संघटन,संस्था किंवा गृप वगैरे न कढता फक्त आणी फक्त रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून काम केली आहे.डां.बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जयंती देखील या रिपब्लिकन पक्षाच्या नावाखाली केली आहे.या व्यतिरिक्त कोरोनाचा आदि सतत दोन वर्ष सामुदायिक विवाह देखील दुधनी येथे रिपब्लिकन पक्षाच्या नावाने तेही बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या औचित्य साधून करण्यात आली आहे.

या पक्षाच्या माध्यमातून प्रामाणिक पणे काम करत असतांना अनेकांचे संबंध जुळवून आल्याने भीमनगर व दुधनी शहरात अनेक नावलौकिक कामे करण्यात आली आहे. यात दुधनी शहरात बाबासाहेब आंबेडकर उद्यान,भीमनगर येथे नियोजित बुध्दविहार जागा,गाणगापूर रेवूर कार्नर येथे डां.बाबासाहेब आंबेडकर चौक,हरिजन वस्तीचे बुध्दनगर नामकरण (तसे नगर परिषदेत ठराव पास करुन घेतली आहे.)आणी रेल्वे स्टेशन येथे बाबासाहेब आंबेडकर चौक स्थापना केलेली आज दुधनी मध्ये बघायला मिळणार्या उदाहरण आहे. या व्यतिरिक्त संजय गांधी निराधार समिती अक्कलकोटचे सदस्य,त्यावेळी असलेल्या ग्रामशिक्षण समिती शिन्नूरचे सदस्य नंतर उपाध्यक्ष,दुधनी स्वस्त धान्य दुकान दक्षता समितीचे सदस्य,दुधनी प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्ण कल्याण समितीचे सदस्य,पाणीपुरवटा सदस्य ग्राम पंचायत सिन्नूर असे अनेक पदाचे अनुभव सामाजिक जीवनामध्ये अनुभवल्यांने अनेकांचे संबंध बांधली गेली आहे. श्री सैदप्पा झळकी यांच्या हा रिपब्लिकन पक्षाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होवून त्यांचे कौतुक करत आहे.

# व्हॉट्सअप समुह माध्यमामधून सामाजिक बांधिलकी जोपासत माजी विध्यार्थांकडून शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

भातसानगर /प्रफुल्ल शेवाळे :सोशल मीडिया च्या माध्यमातून आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्याच शिक्षकांच्या स्मृती प्रित्यर्थ शिष्यवृत्ती देण्याचा, आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा अनोखा उपक्रम पहावयास मिळाला आहे. मुंबईला ला पाणी पुरवठा करणारे भातसा धरण आणि याच ठिकाणी वसलेलं प्रकल्प विदयालय... या शाळेची स्थापना १९७८ ला झाली.. अनेक विद्यार्थी या शाळेने घडवले.. अनेक आदर्श शिक्षकांचा परिस स्पर्श या शाळेला लाभला.. यातच एक आदर्श शिक्षक संदांनशीव सर या शाळेला लाभले.... या सरांनी अनेक गोर गरीब विदयार्थ्यांना व्यक्तीगत मदत केली... शाळेप्रती आपली बहुमोल शिक्षकी सेवा दिली आणि या शिक्षकानं २०२१ साली या जगाचा कायमचा निरोप घेतला.. अशा आदर्श शिक्षकांच्या स्मृती प्रित्यर्थ याच शाळेतील १९९३-९४ बॅच विद्यार्थ्यांनी व्हाट्सअप च्या माध्यमातून एकत्र येत एक शिष्यवृती योजना चालू केली.. या व्हाट्सअप समूहातील मित्रांनी दर महिन्याला एक ठराविक रक्कम जमा करत एक सामाजिक बांधिलकी म्हणून सदर शिष्यवृत्ती योजना चालु केली आहे.. शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेले होतकरू ५ विध्यार्थी याचे लाभार्थी होत असतात..



या समूहाने आतापर्यंत कोरोना काळात, तसेच समाजातील विविध गरजू व्यक्तींना आर्थिक मदत देऊ केली आहे... या शिष्यवृत्ती देणे करिता समूहातील हरिश्र्चंद्र अधिकारी... सुनिल दाभाडे, प्रशांत चन्ने, युवराज गोरें, प्रफुल्ल शेवाळे आदी माजी विद्यार्थ्यांनी स्वतः त्या त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन शिष्यवृत्ती व प्रशस्तीपत्रक बहाल केले.

सदर लाभार्थी विद्यार्थी वर्गाच्या पालकांच्या चेहऱ्यावर स्व. संदांनशीव सर यांच्या प्रती असणारी आदरयुक्त भावना आणि माजी विद्यार्थी बद्दल चे अनोखे कौतुक दिसून येत होते.

सामाजिक बांधिलकी जोपासत आम्ही येणाऱ्या आगामी काळात छोटे मोठे उपक्रम राबवत राहणार आहोत यात बिलकुल खंड पडणार नाही... आमच्या ९३-९४ बॅच च्या संपूर्ण विद्यार्थी मित्रांचा विश्र्वास यामुळे असे उपक्रम नक्कीच भविष्यात आणखीन मोठया प्रमाणात उदयास येतील असे प्रशांत चन्ने,सुनील दाभाडे यांनी म्हटलं आहे.. आपल्या पुढील पिढीच्या विद्यार्थी वर्गाने गुरुजनांचा आदर्श वारसा जपत भविष्यात मार्गक्रमण करत राहण्याचा सल्ला... हरिश्र्चंद्र अधिकारी सर यांनी लाभार्थी विद्यार्थ्यांना दिला आहे. प्रकल्प विद्यालयातील मुख्यध्यापक शिवाजी पाटील सर आणि विद्यमान शिक्षक वर्गाने आपल्या माजी विद्यार्थ्यांना एक कौतुकाची थाप या निमित्ताने देऊ केली आहे..

# पडघा येथे संविधान संवाद कार्यक्रम उत्साहात



भिवंडी/प्रतिनिधीः भारतीय संविधानाची जनजागृती व्हावी, त्या विषयी विद्यार्थ्यांना, नागरीकांना महत्व व संविधानाची मूल्ये कळावी. तसेच त्यांचे प्रबोधन व्हावे याकरिता १२ नोंव्हेबर २०२३ रोजी समता-संघर्ष सांस्कृतिक मंच ठाणे - मुंबई आणि संविधान प्रचारक लोकचळवळ यांच्या वतीने संविधान संवाद कार्यक्रम भिवंडी तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर कुरुंद, लुबिनी बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात पार पडला. गाव ,खेड्यात जाऊन संविधानाचा संवाद झाला पाहिजे. आणि त्याची सुरूवात समता-संघर्ष सांस्कृतिक टीमने केली आहे. असे यावेळी समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे यांनी बोलताना सांगितले. तरुणांनी मोठया प्रमाणात साहभाग घेऊन संविधान समजून घेणे गरजेचे आहे. असे समता संघर्ष संघटनचे उपाध्यक्ष सदानंद गायकवाड यांनी बोलताना सांगितले.

आज देशात जी प्रतीक्रांती होताना दिसत आहे, तीथांबवायची असेल तर संविधानाचे व फुले-शाहू-आंबेडकर विचारांचे प्रचारक बहुसंख्येने तयार होणे आवश्यक आहे.असे ओबीसी संघर्ष समितीचे सरचिटणीस प्रमोद जाधव यांनी बोलताना सांगितले.

यावेळी समता-संघर्ष सांस्कृतिक मंच मुख्य समन्वयक माधुरी शिंदे यानी समता, स्वातंत्र्य बंधुता, न्याय हे मूल्ये सांगत नागरिकांशी सवांद साधला.तरयावेळी समता-संघर्ष सांस्कृतिक मंच मुख्य समन्वयक सुरेखा पैठणे, अक्षय भोईर ,मिलिंद जाधव, भगवान गायकवाड यांनी कविता , गाण्यातून भारतीत संविधानाची जनजागृती केली. यावेळी समता संघर्ष संघटनचे संघटक गणेश सोष्टे, अँड. श्रीकांत कांबळे,अविनाश दोंदे, रमेश जाधव,विद्याधर जाधव, संजीवकुमार शिंदे, रविंद्र गायकवाड, प्रा.भाईदास जाधव,प्रदीप थोरात , आदेश जाधव, अँड.विश्र्वनाथ तायडे,कमलेश जाधव, प्रदीप गायकवाड, अँड.किशोर सावंत, अंनता जाधव, संतोष जाधव,आदित्य जाधव, अनिल शेलार, पंकज भोईर,मनोज सोष्टे, विष्णू सोष्टे, मिलिंद सोष्टे, मयुर सोष्टे, रोहीत जाधव,राजेश जाधव,दिलिप थोरात, दिनेश सोष्टे, प्रकाश जाधव , राकेश जाधव, विनोद रोकडे, अजय सोष्टे, तर आदी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मिलिंद जाधव यांनी केले.तर आभार विशाल सोष्टे यांनी केले.

# विठ्ठल मंदिर समितीने अंध. वृद्ध; अपंग वारकरी भक्तांसाठी रिक्षाची सोय करावी : ग्राहक पंचायतीची मागणी

पंढरपूर/प्रतिनिधीः विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरी नगरी दररोज हा जोराच्या संख्येने भाविक दर्शनासी येतात यामध्ये मोठ्या प्रमाणात वृद्ध अंध. अपंग वारकरी मोठ्या प्रमाणात येतात यांना चालणेही अशक्य असते याकरिता विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने चोफाळा श्रीकृष्ण मंदिरापासून विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत रिक्षाने येण्याची सोय करावी करण्यात यावी असे असल्याचे निवेदनाद्वारे अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने मागणी करण्यात आली आहे

यावेळी अखिल भारतीय पंचायतीचे तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे संघटक महेश भोसले साळुंखे यांनी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांना निवेदन स्वीकारले

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्याची चर्चा करून त्यांनी सांगितले की मंदिर समितीच्या वतीने भाविकांना सोयीकरिता नवीन रिक्षा घेणार असून लवकरच भाविकांना सेवा उपलब्ध करून देण्यात येईल यावेळी पदाधिकाऱ्यांची सांगितले की मंदिर समिती ला दानशूर व्यक्तीने दोन रिक्षा दिल्या होत्या याकरिता मंदिर समितीच्या सदस्य मानवी निगडे यांच्या प्रयत्नातून दानशूर व्यक्तीने दिलेल्या रिक्षा या गेल्या अनेक दिवसापासून बंद अवस्थेत आहेत आपण या तातडीने लक्ष घालून भक्तांच्या सोय करता रिक्षा त्वरित उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून रिक्षा आंद अपंग आणि दमेकरी ज्येष्ठ वृद्ध नागरिक वारकरी भक्त यांना सोय करावी अशी मंदिर समितीच्या आवारात म्हणजे रुक्मिणी फटांगाने येथे एक व महादार पोलीस चौकी येथे या ठिकाणी एक आशा अथवा तुकाराम भवन येथे समोर रिक्षा चालकासह वाटे पाच वाजल्यापासून रात्री मंदिर बंद होईपर्यंत या ठिकाणी उपलब्ध करण्यात याव्यात असेही सुचवण्यात आले गेल्या अनेक



दिवसांपासून भाविकांच्या सोयीसाठी असलेल्या रिक्षा बंद असल्याने विठ्ठल रुक्मिणी दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या वृद अंध. अपंग ज्येष्ठ नागरिक यांना चालण्यात त्रास होत असल्याने ऐनवेळी रिक्षा उपलब्ध होत

नसल्याने शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो याकरिता मंदिर समितीने त्वरित लक्ष घालून रिक्षा उपलब्ध करून द्याव्यात असेही सुचवण्यात आले व रिक्षा वरील ठिकाणी उभ्या असताना त्या रिक्षा चालकाचे भ्रम दोन्ही अर्थात मोबाईल नंबर व्हीआयपी गेटवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या जवळ देण्यात यावेत उपलब्ध असलेल्या रिक्षा चालक व रिक्षा सोडून इतर जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अन्यथा एखाद्या गरजूला रिक्षा ची गरज असल्यास रिक्षा आहे परंतु चालक नाही असे घडू नये याची दक्षता घेण्यात यावी असे व्यवस्थापक यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे आपण नक्कीच करेल या भाविकांची गरज करण्यात येईल असे मंदिर समितीचे व्यवस्थापक यांनी सांगितले

# स्वत: शेतकरी कारखान्याला ऊस द्यायला तयार असताना शेतकरी संघटनेची दादागिरी

टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी या गावाला नदी नाही. यावर्षी दुष्काळ पडल्यामुळे बोर ,विहीर, यांना पाणी कमी आलेले आहे. म्हणूनअनेक शेतकरी स्वतःहून कारखान्याला ऊस द्यायला तयार होत आहेत.परंतु टाकळीवाडी गावातील शेतकर्यांनी पत्रकार परिषद घेऊन आम्ही ऊस तोडी स्विकारणार असा निर्णय घेतल्याचा राग डोक्यात घेऊन शिरोळ तालुक्यातील संघटनेच्या ५०० कार्यकत्ये टाकळीवाडी गावातील पाच शेतकर्यांच्या शेतावर चाल करून आले . यावेळी ऊस तोड घेतलेले शेतकरी नंदकुमार कांबळे यांनी पाण्यामुळे माझा ऊस वाळत असून मी स्वः इच्छेने तोड घेतली आहे असे म्हणत संघटनेच्या कार्यकर्त्यांना गुलाब फुल देऊन गांधीगिरी पद्धतीने विरोध केला. पण संघटनेच्या कार्यकत्यांनी दादागिरी करीत शेतकर्याची गळपट्ट धरुन धक्काबुक्की करत ऊसतोड बंद पाडून पूर्ण शेतीचे नासधुस केली. प्रशासनाकडून वेळेत कारवाई न झाल्यामुळे संघटनेचे कार्यकत्ये हिंसक झाले.शेवटी भारतामध्ये लोकशाही आहे की नाही असा अडचणीत आलेल्यांना प्रश्र्न पडला आहे



व एखादयांचा खासदारकी करीत हे सर्व गरीब शेतकर्यांनी सोसत राहायचे का? असा प्रश्र्न पडला आहे. ऊस वाळत असल्यामुळे ऊस टनेज मध्ये घट होण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे नदी नसलेल्या गावाच्या शेतकऱ्याचे फार नुकसान होत आहे. चारा पाण्याचा प्रश्र्न निर्माण झालेला आहे .यावर्षी पावसाने दांडी मारल्यामुळे टाकळीवाडीतील शेतकरी हताश झाले आहेत. यातच ऊस दर आंदोलनाची तीव्रता वाढत चालली आहे .

# श्री गुरुदत्त शुगर्स लि.कडून ऊसतोड कामगारांना दिवाळीचे फराळाचे वाटप



टाकळीवाडी/प्रतिनिधीः तालुका शिरोळ येथील नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व शेतकरी हित केद्रस्थानी ठेऊन काम करणारा श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी

यांच्याकडून ऊसतोड मजुरांना दिवाळी फराळाच वाटप करण्यात आल. सध्या हंगामाचे दिवस असल्यामुळे त्यांना आपल्या घरी दिवाळी साजरा करता येत नसल्याने त्यांची दिवाळी गुरुदत्त शुगर्स ने गोड करून खऱ्याखुऱ्या माणूसकिचे दर्शन घडवले आहे . ऊसतोड कामगारांना नेहमी श्री गुरुदत्त साखर कारखाना सहकार्य करत असतो. कशाचेही कमतरता न भासता सर्व सुख सुविधा त्यांना पुरवल्या जातात. ऊसतोड मजूर यांच सुद्धा मोलाच योगदान आहे. ऊसतोड कामगार स्वतः सांगतात आम्हाला कशाची कमतरता श्री गुरुदत्त ने कमी पडू दिलेली नाही. लहान बालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. ऊसतोड मजुरांना शुद्ध पाणी ,खर्चासाठी पाणी, दवाखाना ,या सह सर्व सुख सुविधा देण्यात आलेले आहेत. यातच खरा श्री गुरुदत्त साखर कारखान्याचा अभिमान आहे.

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ठेवीवरील व्याज बँकेत जमा





पंढरपूर/प्रतिनिधीः कर्मवीर सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना या सभासद शेतकऱ्यांच्या ठेवीवरील व्याज बँकेत वर्ग केल्याची माहिती चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिलीश्रीपुर तालुका माळशिरस येथील कर्मवीर सुधार पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या शेतकऱ्यांच्या सभासदांच्या ठेवीवरील व्याज बँकेत वर्ग करण्यात आले आहे

शेतकरी सभासदांचे ठेवी१२ कोटी द.साद.श. .८% प्रमाणे रुपये ९६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात आले आहे अशी माहिती कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे कार्यकारी संचालक ड्रॉ यशवंत कुलकर्णी व सर्व संचालक उपस्थित होते कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वतीने प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे व सोलापूर जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त दर देण्या देण्यात आला आहे मोठ्या मालकाचा आदर्श घेऊन प्रत्येक वर्षी ठेवीवरील व्याज बिल दिले जाते ऊस उत्पादक शेतकऱ्याबरोबर ठेविवाल्यांना सुद्धा दिलासा मिळाला आहे बँकेकडून ठेवीदारांना पाच ते सात टक्के व्याज दिले जाते कर्मवीर सुधार पंत परिचार पांडुरंग सहकारी साखर कारखाना वतीने आठ टक्के प्रमाणे व्याज ठेवीदारांना दिले जाते कारखान्याचा गळीत हंगाम २०२३२४ उच्चाने क्षमतेने चालू असून यावर्षी ,११ मॅट्रिक टन गाळप करण्याचे उद्दिष्ट कारखान्याने ठेवलेले आहे प्रतिनिधींनी नऊ लाख मेट्रिक टन गाळप करत असून कारखान्याचा दिसणारी प्रकल्प ९०के.एल.पि.डि. क्षमतेने व्यवस्थितपणे चालू आहे को जनरेशन ही अतिशय व्यवस्थितपणे चालू आहे जास्तीत जास्त वीज एक्सपोर्ट करीत आहोत अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी दिली पुढे म्हणाले की २०२३२४ चा गाळप हंगाम पूर्ण क्षमतेने चालू आहे कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक वाईस चेअरमन कैलास खुळे व संचालक यांच्या सहकार्याने कारखान्याच्या इतिहासात सर्वोच्च गायक क्षमतेने सुरू आहे

यावेळी कारखाने संचालक दिनकर मोरे वसंत नाना देशमुख दिलीप चव्हाण उमेश परिचारक तानाजी वाघमोडे बाळासाहेब भगवान चौगुले भास्कर गावडे भैरव वाघमारे हनुमंत कदम सुदाम मोरे किसन सर्व दे लक्ष्मण धनवडे राजू पाटील शामराव साळुंखे सिताराम शिंदे संचालक दाजी पाटील विजय जाधव इत्यादी आदी उपस्थित होते

# डॉ.कुमार लोंढे यांचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखे आहे



माळशिरस/प्रतिनिधीः राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री व विधान परिषदेचे सदस्य मा.महादेव जानकर यांनी माळशिरस तालुक्यातील चांदापुरी (सोलापूर) येथे सदाशिव देठे निवासी प्रशाला व ज्यू कॉलेज ला सदिच्छा भेट दिली या भेटीप्रसंगी त्यांनी शाळेचे संस्थापक डॉ.कुमार लोंढे यांच्याविषयी वरील गौरव ऊदगार व्यक्त केले. सुरुवातीस भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महादेव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना ते म्हणाले बहुजन समाजातील व्यक्तीने शाळा,कॉलेज काढणे व चालवणे मुश्किल कार्य आहे .कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण संस्थेमुळे मी शिकलो परन्तु आज शिक्षणात व्यवसायिकता आली आहे या बाबीस अपवाद डॉ लोंढे कुटुंबीय आहे त्यांनी या भागातील गरिबांची मुले शिकावी म्हणून हा प्रामाणिक प्रयत्न केला आहे शाळेला जागा देणारे देठे कुटुंबीय सुद्धा धाडसी आहे.

या शाळेचे संस्थेचे मेडिकल कॉलेजमधे रूपांतर व्हावे.या संस्थेस सर्व प्रकारची मदत करण्यास मी तयार आहे यावेळी त्यांनी नुसतं आश्र्वासन न देता दहा लाख रु निधी संस्थेस देण्याचे जाहीर केले. बहुजन समाजाची,शेतकऱ्यांची पोरं शिकवा मी व माझा पक्ष आपल्या या विधायक कार्यास सोबत राहू असे अभिवचन ही त्यांनी दिले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे संस्थेच्या सचिव डॉ.पंचशीला लोंढे, सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य डी. जी. कांबळे,प्रा.संभाजी बनसोडे,रासपचे बाळासाहेब डोंगरे,सुहास पाटील, बाळराजे विरकर, माळशिरस कोर्ट चे ऍड धनंजय बाबर,रिपाई चे रणजित सातपुते,युवा उद्योजक भैय्या बाबर इ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.राजेश वायदंडे,प्रा.कारंडे,प्रा,अल्ताफ पठाण,प्रा.नितीन सरक,काळे मॅडम,अरुणा मॅडम,आकाश सरतापे इ नी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य के साठे यांनी केले तर शेवटी आभार संस्थापक डॉ. कुमार लोंढे यांनी मानले.

## ॲड.आमिर खान यांचे यश

करमाळा : एलएल.एम. या पदव्युत्तर परीक्षेत करमाळा शहरातील ॲड. आमिर अब्दुल वहाब खान यांनी ८६.८८ गुण मिळवत पुणे विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. एलएल.एम. पदवी ही आंतरराष्ट्रीय, कॉर्पोरेट, कामगार कायदा, मानवी हक्कांसह इतर देशांच्या कायदेविषयक सेवांसाठी उपयुक्त ठरते. कायद्याचे डॉक्टर समजल्या जाणाऱ्या या पदवीत अतिशय कष्ट घेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल खान यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दिवाळीच्या पूर्वसंध्येला दोन्हीही साडू भावांचा दुर्दैवी मृत्यू

## तालुक्यामध्ये हळहळ, एक कोर्टामध्ये सेवानिवृत्त अधिकारी तर दुसरे जिल्हा परिषद शिक्षक..



कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब – लातूर राज्य मार्गावरील घारगाव येथे शनिवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२३ रोजी संध्याकाळी सहाच्या दरम्यान दोन दुचाकी च्या अपघातात दिवाळीच्या पूर्वसंध्येला तिघांचा मृत्यू झाला आहे. या मयतापैकी दोन कळंब शहरात वास्तव्यास होते. तर तिसरा कळंब तालुक्यातील वाकडी (इस्तळ )या गावचे रहिवाशी होते. याबाबत सविस्तर माहिती अशी की लातूर – कळंब राज्य मार्गावरील घारगाव गावालगत शनिवारी रात्री वाकडी ( ई) येथील महादेव गिरी याच्या दुचाकीचा कळंब कोर्टामधील सेवानिवृत्त अधिकारी भाऊसाहेब. गांधले व जिल्हा परिषद शिक्षक झुंबर ओव्हाळ सर यांच्या दुचाकीला महादेव गिरी यांनी जोरदार अशी धडक दिल्यामुळे डोक्याला मार लागल्यामुळे तीघेजण जागीच ठार झाले. भाऊसाहेब गांधले (६०) झुंबर ओव्हाळ सर (५२)

कळंब या दोघांसह वाकडी (इ)येथील महादेव गिरी (३६) या ही व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. मयत भाऊसाहेब गांधले हे न्यायालयीन सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. तर झुंबर ओव्हाळ हे भाटसांगवी तालुका कळंब येथील जिल्हा परिषद प्रशालेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. ते जोशाबा पतसंस्थेचे संचालक सुध्दा होते. आपघातातील मयत भाऊसाहेब गांधले व झुंबर ओव्हाळ हे सख्खे साडू होते. दोघांची मूळ गाव कडकनाथ वाडी तालुका वाशी, जि.धाराशिव, सध्या वास्तव्यास नोकरीच्या ठिकाणी कळंब शहरांमध्ये आहेत. मयत भाऊसाहेब गांधले व झुंबर ओव्हाळ सर हे दोघेही भाऊसाहेब गांधले यांच्या गाडीचे स्पेअर पार्ट आणण्यासाठी लातूरला गेले होते. तेथून येताना परतीच्या प्रवासामध्ये त्यांच्यावर काळाने घाव घातला.मयत भाऊसाहेब गांधले यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, व नातवंडे असा परिवार आहे. तर मयत झुंबर ओव्हाळ सर यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, व नातवंडे असा परिवार आहे. या दोघांचीही सासरवाडी वाकडी ( के) तालुका कळंब येथील होती. ही बातमी कळतात सर्व तालुक्यातून हळहळ करण्यात आली.

# लेण्याद्री (जुन्नर ) येथे ऐतिहासिक बौद्ध धम्म अधिवेशन संपन्न

पुणे/राहुल बनसोडे : भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्र्चिम यांच्या वतीने पुणे विभागीय बौद्ध धम्म अधिवेशन लेण्याद्री,जुन्नर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्र्चिमचे अध्यक्ष आयु.प्रकाश ओव्हाळ होते. या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय अध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव यशवंत आंबेडकर यांचे अधिवेशनास संबोधन व मार्गदर्शन होते. सदर कार्यक्रमासाठी भन्ते अंगुलीमाल,भन्ते धम्मानंद व भिक्षु संघ, केंद्रीय शिक्षक कांबळे, पुणे जिल्हा पूर्व – पश्र्चिम, पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर आदी विभागातून भारतीय बौद्ध महासभा चे पदाधिकारी व साधारण ३००० बौद्ध उपासक व उपासीका उपस्थित होते.




या अधिवेशनाचे प्रमुख अतिथी भारतीय बौद्ध महासभा चे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य प्रभारी आयु. एस. के.भंडारे हे होते. या अधिवेशन प्रसंगी भारतिय बौद्ध महासभेचे आंतरराष्ट्रीय सचिव कॅप्टन प्रविण निखाडे तसेच महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष आयु.भिकाजी कांबळे,समता सैनिक दलाचे असिस्टंट स्टाफ ऑफिसर आयु.दादासाहेब भोसले,असिस्टंट लेफ्टनंट जनरल सचिव आयु. असिस्टंट लेफ्टनंट जनरल आयु.पी. एस.ढोबळे पुणे जिल्हा पश्र्चिमचे जिल्हाध्यक्ष कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश ओहाळ, सोलापूर जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे हनुमंत जगताप सातारा जिल्हाध्यक्ष श्रीमंत घोरपडे सुदाम ठाकरे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष भोसले सर सांगली जिल्हा अध्यक्ष रुपेश खामगावकर रवींद्र लोंढे पिंपरी चिंचवड राधाकांत कांबळे पुणे पूर्व अरुण सोनवणे पुणे शहराध्यक्ष जिल्ह्याचे सिद्धार्थ नागदेवते महाराष्ट्र राज्य महिला उपाध्यक्ष धम्मरक्षिता कांबळे महाराष्ट्र राज्य महिला संघटक शारदा गजभिये, सुजाता ओहाळ,रेखा ढेकळे, नागसेन माने, दत्तात्रय सिध्दगणेश,गौतम जगझाप,बाबु रणखांबे, यशवंत साबळे,रमा ढावरे.धम्मपाल माने उपाध्यक्ष, आदी मान्यवर उपस्थित होते.

या विभागीय अधिवेशनाच्या अगोदर लेण्याद्री येथील बौद्धलेणींना आदरणीय डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांनी भेट दिली. यानंतर जुन्नर शहरातून आदरणीय डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या स्वागतासाठी सवाद्य नेत्रदीपक भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या धम्मरॅलीमध्ये हजारो लोकांचा जनसमुदाय व सर्व जाती – धर्माचे, पंथाचे लोक उपस्थित होत. घोडे, उंट व अश्र्वरथासह रॅलीमध्ये फटाक्यांची आकर्षक आतषबाजी हे रॅलीचे आकर्षण ठरले.

आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ. भिमराव आंबेडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि बाबासाहेब यांचे कसे अतूट नाते होते हे सांगितले तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची दखल संपूर्ण जगाने घेतली आहे. त्या छत्रपतींची जन्मभूमी आणि तथागत बुद्धांची धम्मभुमी अशा जुन्नर तालुक्यात मला यायला उशीर झाला अशी खंत त्यांनी अधिवेशनाच्या वेळी व्यक्त केली.

देशातील सर्व लेण्यांना जागतिक वारसा व दर्जा मिळाला तर खऱ्या अर्थाने त्यांचे संरक्षण होईल असे मत त्यांनी मांडले. या देशातील सुज्ञ नागरिकांनी सद्सद विवेक बुद्धी जागृत ठेऊन घटनाविरोधी शक्तींना नाकारायला हवं असं आवाहन त्यांनी केलं. बाबासाहेबांनी जेवढ्या परिषदा घेतल्या त्यातील सर्वात जास्त परिषदा मातंग समाजासाठी घेतल्या होत्या अशी आठवण त्यांनी करून दिली. सर्व समाज घटकांनी सत्य जाणून घेणे महत्त्वाचे आहे व त्या दिशेने सर्वांचे प्रयत्न असावेत तसेच लेण्यांचे खरे वारसदार आपण आहोत म्हणून आपला वहिवाट लेण्यांवर असणे गरजेचे आहे असा त्यांनी सल्ला दिला. ऋ२० च्या परिषदेमध्ये पंतप्रधानांनी बौद्ध विद्यापीठांच्या प्रतिकृतीचे दर्शन इतर देशांना दिले हीच खरी ओळख देशाची आहे असे त्यांनी सांगितले. म्हणून धम्म चळवळ संकोचीत न ठेवता सर्व समावेशक व्हायला हवी असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला व डॉ. भिमराव आंबेडकर यांनी आपल्या संबोधनातून आलेल्या सर्व बौद्ध उपासक उपासिका यांचे प्रबोधन व मार्गदर्शन केले.अधिवेशन यशस्वी झाल्याचा दाखला देत, सर्व आयोजकांचे त्यांनी आभार व्यक्त केले. या अधिवेशनाची सुरुवात समता सैनिक दलाच्या नेत्रदिपक संचलनाने झाली. अधिवेशनाचे यजमानपद हे भारतीय बौद्ध महासभा जुन्नर तालुका यांच्याकडे होते. अधिवेशन प्रसंगी मा.विक्रीकर आयुक्त आणि जुन्नर तालुका बौद्धजन संघाचे अध्यक्ष आयु. के. बी.वाघमारे यांचा विशेष सत्कार डॉ.भीमराव साहेबांच्या हस्ते करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्र्चिम व त्याअंतर्गत असणाऱ्या जुन्नर, आंबेगाव, खेड उत्तर, खेड दक्षिण, मावळ उत्तर, मावळ दक्षिण, मुळशी, देहूरोड शहर, आळंदी शहर इत्यादी तालुक्यांच्या कार्यकारीणी यांनी केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांचे स्वागत तसेच उपस्थित मान्यवरांचे स्वागत भारतीय बौद्ध महासभा जुन्नर तालुका अध्यक्ष आयु. राकेश सुदाम डोळस यांनी केले. अधिवेशनाची सुरुवात अरविंद पंडित (पर्यटन सचिव भारतिय बौद्ध महासभा पुणे जिल्हा पश्र्चिम) यांच्या स्वरचित स्वागत कवितेने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु.भगवान शिंदे (संस्कार सरचिणीस पुणे जिल्हा पश्र्चिम) यांनी केले तर आभार आयु.आतिश उघडे (संस्कार सचिव पुणे जिल्हा पश्र्चिम) यांनी मानले. या अधिवेशन प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा जुन्नर तालुका कार्यकारणी यांच्या वतीने डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांना जुन्नर मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे बौद्ध विहार, नारायणगाव शासकीय विश्रामगृह येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व जुन्नरमधील सर्व लेणींचे संवर्धन व सुशोभीकरण व्हावे या प्रमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी जुन्नर तालुका व संपूर्ण पुणे जिल्हातील विविध राजकीय, सामाजिक संघटना त्यांचे पदाधिकारी व समाजातील मान्यवर मंडळीचे बहुमोल योगदान लाभले. अधिवेशनासाठी जुन्नर तालुक्यातील व पुणे जिल्ह्यातील सर्व पत्रकार बंधुभगिनी उपस्थित होते.

# धावत्या रेल्वे ने माय लेकरांना चिरडले!

पंढरपूर/प्रतिनिधीः धावत्या रेल्वे माय लेकराला चिरडल्याने दोघांचाही मृत्यू अत्यंत दुर्दैवी घटना पंढरपूर सांगोला रेल्वे मार्गावर घडली अन दिवाळीच्या सणांमध्ये एका कुटुंबावर मोठी संकट कोसळले सगळीकडे दिवाळीचे धामधूम सुरू असताना आणि प्रकाशात एक वेगळा उत्साह साजरा केला जात असताना सोलापूर

जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील एका कुटुंबावर मात्र शोक करण्याची वेळ आली आहे पंढरपूर सांगोला रेल्वे मार्गावर म्हसोबा मंदिराजवळ वर्धा वेगाने जाणाऱ्या रेल्वेने दोघांना चिरडले असल्याचे दिसून आले एक महिला आणि एक मुलगा पुरुषाचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळून आला परंतु त्याची ओळख पटत नव्हती परंतु सांगोला तालुक्यातील मांजरी येथील पोलीस पाटील किशोर पाटील यांनी या घटनेबाबत गावातील हरित मुजावर यांनी दिली आरोप यांचा भाऊ आणि आई हे घरी नव्हते त्यामुळे त्यांनी घटनास्थळी नाव घेतली असता हे मृतदेह त्यांच्यावर आईचे आणि भावाचे असल्याचे दिसून आले आणि दोन्ही मृतांची ओळख पटली मांजरी येथील मिजास्वामी इस्माईल मुजावर वय ७५ वर्षे मुलगा ५५ वर्षाचा इंदूस इस्माईल मुजावर मुजावर यांची परिस्थिती आजारी होते ते दवाखान्यात गेले असता परत येत असतानाही घटना घडली त्यांच्यावर पंढरपुरातील खाजगी दवाखान्यांमध्ये उपचार सुरू होते या दोघांनी भडगाव जगातील रेल्वेने चिरडले असल्याचे दिसून आले या माय लेकरांच्या परिसर व्यक्त होत असून ही घटना नेमकी कशी घडली याबाबत काहीच माहिती मिळू शकत नाही आई आणि मुलगा रेल्वे मार्गावर कशासाठी गेले होते हा अपघात आहे की आणखी काही आहे असे काही प्रश्र्न उपस्थित होत असून पोलीस अधिक तपास करीत आहेत परंतु आणि दिवाळी या घडलेल्या घटनेमुळे अनेकांच्या मनाला वेदना झाले आहेत

# दिवाळीनिमीत्त सह्याद्री संस्था करमाळ्यात रक्तदान शिबीर संपन्न



करमाळा/प्रतिनिधीः दिवाळीनिमीत्त सह्याद्री बहुउद्देशीय सामाजिक संस्था व विठ्ठल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने करमाळ्यात रक्तदान शिबीर संपन्न

१३ नोव्हेंबर रोजी मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर भरवण्यात आले त्यामध्ये अनेक रक्तदात्यांनी रक्त दिले व आरोग्य शिबिरासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमासाठी करमाळा तालुक्यातील राजकीय व प्रशासकीय व्यक्तींनी उपस्थिती नोंदवली, तसेच या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मुख्तार मोमीन, सचिव विनोद पवार, खजिनदार फिरोज शेख तसेच उपाध्यक्ष विनोद जाधव, सहसचिव निलेश राठोड, कुलदीप जाधव, श्रीपाद जोशी, अमित चोरमले स्वप्निल चोरमले, शंकर दुधे, महेश गवळी हे सदस्य उपस्थित होते तसेच या कार्यक्रमासाठी विठ्ठल हॉस्पिटलचे डॉक्टर राम बिनवडे यांचे विशेष सहकार्य लाभले